पुणे, दिनांक २८/७/२०१९

# प्रेस नोट

मा. डॉ. के. व्यंकटेशम्, पोलीस आयुक्त, पुणे शहर व मा. श्री. रविंद्र शिसवे, पोलीस सहआयुक्त, पुणे शहर यांचे आदेशान्वये, श्री. मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर, श्री. बच्चन सिंग, पोलीस उपआयुक्त, गुन्हे, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील सर्व युनिटचे अधिकाऱ्यांनी पुणे शहरात परिमंडळ १ ते ५ चे परिक्षेत्रामध्ये दिनांक २८/७/२०१९ रोजी रात्रौ २२.०० वा. ते पहाटे ०५.०० वा. चे दरम्यान कोंबींग ऑपरेश व आस्थापनावर कारवाई करण्यात आली आहे.

कोंबींग ऑपरेशनमध्ये एकूण २६ गुन्हेगारांपैकी ३ गुन्हेगार जेलमध्ये, ४ तडीपार, १४ मिळुन आलेले व ५ आरोपी मिळुन आलेले नाहीत. तसेच कोंबींग ऑपरेशन दरम्यान आस्थापना चेक केले असता, एकूण ३८ हॉटेल आणि पब चेक केले करण्यात येवुन, त्यापैकी सोशेल हॉटेल, हॉटेल ३६० डिग्री, हॉटेल आलोहा द टिक्की बार, द बॅक हब स्टेज, डस्क पब, माकाझा पब इ. हॉटेलवर व २ पानटपरींवर शर्तीपेक्षा जास्त वेळ चालू ठेवले बद्दल महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३३(क्ष) १३५ प्रमाणे खटले दाखल करण्यात आले आहेत.

लष्कर पोलीस स्टेशन हद्दीतील १७७१/२३, भीमपुरा कॅम्प, पुणे येथे छापा टाकुन १५ इसमांना पकडून त्यांचे ताब्यातुन किंमत रुपये ९१४०/- रोख व पत्त्याची पाने मिळुन आल्याने लष्कर पोलीस स्टेशन येथे २९७/२०१९ महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच भागीरथ नगर, वारजे माळवाडी मुख्य रोडलगत, सार्वजनिक मोकळया जागेत येथे छापा टाकला असता, एक इसम किंमत रुपये ८१० रुपयांचा अवैध दारुविक्रीचा माल विक्रीकरीता जवळ बाळगताना मिळुन आल्याने, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन गुरनं २९२/२०१९, मुंबई प्रोव्हिबीशन ॲक्ट कलम ६५ (ख) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई गुन्हे शाखेकडील पोलीस श्री. अरुण वायकर, श्री. गजानन पवार, श्री. राजेंद्र मोकाशी, श्री.अंजुकन बागवान, श्री. दत्ता चव्हाण, श्री. राजेंद्र मोहिते, श्री. टिकोळे व श्रीमती वैशाली चांदगुडे यांचे पथकातील कर्मचाऱ्यांनी केली आहे.